दिनांक १६/०१/२०२४

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १५/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

### अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगावपेठ अप क्र १५/२०२४ कलम २७९ भादवी | इसार पेर्टोलिपंप नागपुर हायवे बोरगाव धर्माळे | दि १४-०१-२४ चे १०-०० वा<br><br>दि १५-०१-२४ चे १९/११ वा | गौरव रघुनाथराव बेलसरे वय ३५ वर्षे रा.विलास नगर गल्ली नं १ गजानन महाराज मंदीरा जवळ अमरावती | ट्रक क्र.WB-१३-F-६८६३ चा चालक | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की यातील फी हे त्याचे मित्रा सोबत त्यांची मारोती अल्टो गाडी क्र MH-३१-CN-६५४९ ने सावरबंध भंडारा येथे जात असतांना इसार पेर्टोलपंप नागपुर हायवे रोडवर यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचा ट्रक हयगयीने व निष्काळजी पणाने चालवुन ट्रक ओव्हरटेक करण्याचे प्रयत्नात फि चे गाडीला धडक देवुन गाडी डिव्हायडरला घासत नेली त्यामुळे फि ची गाडी विरुद्ध दिशेला जावुन डिव्हायडरला आढळली त्यामुळे गाडीचे अंदाजे ६००००रुपयाचे नुकसान झाले कोणाीही जखमी नव्हते अशा फि यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे गाडगे नगर अम शह अप क्र.६९/२०२४ कलम २७९, ३३७ भादवी | रॉ फीटनेस जिम कॉटन मार्केटजवळ अमरावती | घतावेळ १५.०१.२०२४ चे १९.००वा दातावेळ १५.०१.२०२४ चे २२.५७ वा | वेदांत गंगाधर खलोकर वय २४वर्ष व्यवसाय वकीली रा १६ पुर्वा टाउनशीप अर्जुन नगर रोड अमरावती | एम एच ३१ एफ एच ६०८५ मोपेड गाडीवरील इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फीर्यादी हे त्यांची मोपेड गाडी क्रमांक एम एच २७ सी आर ३२४० एक्टीवा ने नमुद घतावेळी वठीकाणी जात असतांना मागून येणा-या गाडी क्रमांक एम एच ३१ एफ एच६०८५ एपरेला १५०सीसी दुचाकी मोटर सायकल चालकाने मागून भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने आपली मोटर सायकल चालवून मोपेड एक्टीवा गाडीला ठोस मारली. त्यामुळे फीर्यादीच्या उजव्या पायाच्या मांडीवर व पोच्यावर मुक्कामार लागला आहे. वरुन फीचे जबानी रीपोर्टवरुन व मेडी सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र १४/२४ कलम २७ एन.डी.पी.एस. अँक्ट | नगर पालीका शाळा लालखडी रोड बिस्मीला नगर अमरावती | दि.१५/०१/२०२४ चे १६/३० वा ते १७/५० वा दाखल दि. १५/०१/२०२४ चे १८/२६ वा | पो.उपनि. सुशील कोडापे पो.स्टे नागपरीगेट अमरावती | सादीक अली हसन अली वय २९ रा बिस्मील्ला नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पोलीस स्टेशन नागपुरीगेट येथे स्टे.डा क्र १८/२४ वेळ ११/५१ प्रमाने पोहेका ११५३,पोका १४८९,१७३७, यांचे सह पो,स्टे हद्दीत आंमली पदार्थ सेवन करणारे लोकांचा माहीती काढुन रेड करने कामी लँपटँप ,प्रिन्टर आणी सिलचे इतर साहित्यासह खाजगी वाहनाने पेट्रोलींग करित असतांना १६/३० वा एक इसम नगर पालीका शाळा लालखडीरोड बिस्मील्ला नगर अमरावती यांचे भिंती लगत सार्वजनिक ठिकाणी बसुन गांजा नावाचे अमली पदार्थाचे सेवन करतांना दिसुन आला दोन पंचाना बोलावुन वरील माहीती समजावुन सांगितली व त्यांना पंच म्हणुन हजर राहण्यास कळविले पंचानी संमती दिल्ययावरुन आम्ही दोन्ही पंच व पो.स्टाफ असे गांजा चोळीत असलेल्यया इसमाजवळ आलो व सोबत चे पो.स्टाफ चे मदतीने घेराव घालुन थांबविले त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव सादीक अली हसन अली वय २९ रा बिस्मील्ला नगर अमरावती असे सांगितले तो आम्हाला पंचा समक्ष गांजा नावाचा अमली पदार्थ पितांना मिळुन आला त्याची पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्ययाचे ताब्यातुन गांजा नावाचा अमली पदार्थ असलेले एक प्लास्टीकचे छोटे पाउच आणी माचीस ,चिलम असे गांजा पिण्याचे साहित्य मिळुन आले सदर मुद्देमाल आम्ही पंचासमक्ष पुढील कारयवाही करिता आपले ताब्यात घेतला सदर गांज्याचे पाउच त्यांनी स्वता पिण्याकरिता आणलेले असुन चिलम मध्ये गांजा भरुन त्याचे सेवन केलेले असल्याचे त्याने सांगितले सदर इसमाने गांजा पदार्थ सेवन केलेले असल्ययाने झींगलेला असुन त्याचे अंगझडतीत इतर कोंणत्याही मौल्यवान वस्तु मिळुन आल्या नाही सदर आरोपीचे ताब्यात मिळुन आलेले गांजाचे पाउच चिलम आणी माचीस एका कागदी लिफाफ्यात टाकुण त्यास एस १ असा मार्क देण्यात आला सदर लिफाफ्यावर पंचा आरोपी व आमचे सहीचे लेबल लावुन सिलचे सिलबंद करण्यात आले तसेच सदर आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन त्याचे लघवी व रक्ताचे सिलबंद नमुने प्राप्त करण्यात आले तरी सदर आरोपीचे हे कृत्य कलम २७ एन.डी.पी एस अँक्ट प्रमाने होत असल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| 3 | पोस्टे वलगाव अपक्र.14/2024 कलम185 मो.वा.का.प्र | पोस्टे वलगावपरीसर | 14/01/2024 चे21/30 वा दाखल ता. दि. 15/01/20 | पोकाँ अजहर शेख बन्नु ब.न.1857 पोस्टे वलगाव अमरावती शहर. | साबिर पठान साहेब खाँ पठान वय 26 वर्षरा.ग्राम रेवसा.ता.जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, आम्ही गणवेशधारी अजहर अहेमद शेख बन्नु ब.न.1857 पोस्टे वलगाव पो.स्टाँ फ सपोनि सचिन ईंगळे, पोकाँब.न.43, 1856, यांचे सोबत आज दि.14/01/2024 रोजी पोलीस स्टेशन वलगाव येथे रात्र गस्त ड्युटी करीत असतांना 21/30 वा.मोटरसायकल क्र.MH 27 CM 2789 चा चालक हा त्याची मोटर सायकल अत्यंत वेगात ववेडीवाकडी चालवत पोलीसस्टेशन चे आवारा मध्ये आला. मोटर वाहन्न चालकास जवळ बोलावुन त्याचे नाव गाव विचारले असता.त्याने अडखडतपणे त्याचे नाव साबीर साहेब खाँ पठान वय 22 वर्षरा.रेवसा ता.जि.अमरावती.असे सांगीतले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | माणेदाखल. | | 24 चे 00/31 वा. | | | सदर वाहन चालकाचे तोंडाचावास घेतला असता उग्र व दारुसारखा येत असल्याने त्यास पुढील कार्यवाही करीता पो.स्टाफचे मदतीने ताब्यात घेवु .वैधकियअधिकारी, जिल्हासामान्य रुग्नालय अमरावती यांचे कडुन तपासनी केली असता. मा.वैद्य.अधिकारी यांनी सदर ईसम हा दारु पिलेलाअसल्याबाबत त्यांचे अहवालामध्ये नमुद केले आहे.सदरमोटर वाहन चालकना मे साबीर साहेब खाँ पठान वय 22 वर्ष रा.ग्राम रेवसा.ता.जि.अमरावती.यांनी त्याचे ताब्यातील मोटर वाहन स्प्लेंडर ज्याचा क्र.MH 27 CM 2789 वरील नमुद दिनांक व वेळ वठीकानी मध्यपान केलेल्या स्थितीत स्वत:च्या तसेच रस्त्या चा वापर करणा-या इतरांच्या जिवितासधोका होईल अशा वेगाने व रितीने आमच्या समक्ष हाकले.त्यांनी कलम 185 मोवाका 1988 अन्वये शिक्षेस पात्र अपराध केला आहे.तरी चालकना मे साबीर साहेब खाँ पठान वय 22 वर्ष रा. ग्राम रेवसा .ता. जि.अमरावती यांचे विरुध्द वरील प्रमाणे कार्यवाही होणेस आमची फिर्याद आहे.अशा फिर्यादिच्या लेखी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| 4 | पोस्टे वलगाव अप क्र.15/2024 कलम 5,5(सी),5(डी),9(ए),महाराष्ट्रा पशु सरंक्षण अधिनियम 1976,कलम 11(1)(आय )प्रण्याच्या छळ प्रतिबंधक अधि – 1960 ,429 | सुफिनगर जवळ नर्मदा नगर वलगाव | दि.15/01/2024 चे 12/10 वा. वा. दाखल दि.15/01/2024 चे 18/15 वा. | सरतर्फे – पोउपनि विश्वजीत सरनाईक पोस्टे वलगाव अमरावती शहर. | 1)रिजवान अहमद गुलाम हुसेन वय 41 वर्ष<br><br>2) नौशाद अहमद गुलाम हुसेन वय 38 वर्ष दोन्ही रा.सुफिनगर जवळ नर्मदा नगर वलगाव ता.जि.अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे की, आम्ही पोउपनि विशवजित सरनाईक आज रोजी दिवस पाळी DO कर्तव्यावर असतांना गोपनिय बातमी दारा कडुन माहीती मिळाली की, रिजवान अहमद गुलाम हुसेन वय 41वर्ष रा. सुफिनगर वलगाव याचे घरी गौवंश जातीचे जनावर कापुन त्याची मास विक्र सुरु आहे सदर बाबत स्टेशन डायरी मध्ये 17/24 वेळ 12/02वा अन्वये नोंद घेवुन आम्ही पोउपनि गजानन बोरवार ,गणेश बाभुळकर ,ASIप्रदिप सावरकर ब.नं 16 पोहेका 1067 ,पोका ,197,दोन पंचांच्या सह रवाना होवुन सुफिनगरला लागुन नर्मदा नगर वलगाव अमरावती रिजवान अहमद गुलाम हुसेण याचे घरा समोर गेलो व त्यास आवाज देवुन बोलावले ते घराबाहेर आले असता त्यांना त्याचे घराची घरझडती घ्यावयाची असल्याचे कारण सह सागुन पोलीस पथकाची अंगझडती दिली असता त्याने घरझडती देण्या बाबत होकार दिला असता आम्ही घरमालक रिजवान अहमद गुलाम हुसेन वय 41वर्ष पंच व पोलीस पथक असे त्याचे घराचे लोखंडी गेट खोलुन आत प्रवेश केला असता सदर घर पक्के विटा सिमेंट चे बाधले असुन पश्चिम मुखी तेथुन आत मोकळे अंगण आहे घराचा दक्षिण बाजुस एक विणादरवाजाचे दार असुन त्याला लागुणच विस बाय तिस फुटाची जागा असुन त्यामध्ये टिनाचे शेड आहे सदर जागेत दक्षिण बाजुस एका कोप-यात गौवंश जातीचे मास कापलेले दिसत आहे तर तेथेच एका कोप-या मध्ये जनावराचे पोटातील अवयव शेन व रक्ताचे दाग दिसत आहे तसेच तेथे एक लोखंडी कुराळ व तिन सु-या एक गोलाकार मटण कापल्याचे लाकुड पडलेले दिसत आहे सदर ठीकाणी पशुधन अधिकारी शिराळा यांना बोलावुन पंचाच्या समक्ष खालील प्रमाणे माल जप्त करण्यात आला सदर माल पशुधन अधिकारी यांनी सिल करुन तो ताब्यात दिला 1)गौवंश जातीचे जनावराचे मास 135किलो अंदाजे किंमत 16200रुपये 2)गौवंश जातीचे जनावराचे पोटातील अवयव 60किलो अंदाजे किंमत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भादवि 1860 प्रमाणे दाखल | | | | | 1000रुपये 3) एक लाकडी दांडा असनारी धार-धार लोखंडी कुराड अंदाजे किंमत 200रु 4) तिन लोखंडी सु-या अंदाजे किमत 250रुपये 5) मटण कापण्याचे गोलाकार लाकुड अंदाजे किंमत 100रुपये 6)दोन लोखंडी घमेली असणारे लोखंडी तराजु व काटा व पाच किलो वजनाची चार वजण मापे अंदाजे किंमत 3000रुपये एकुण किंमत 20750रुपये तरी आरोपी क्र 1) रीजवान अहमद गुलाम हुसेन वय 41 वर्ष 2) नौशाद अहमद गुलाम हुसैन वय 38 वर्ष दोन्हि रा सुफिनगर वलगाव अमरावती यांनी अवैधरित्या गोवंश जनावराची कत्तल करुन ठार मारल्याचे तसेच गोवंश जनावराला क्रूरतेची वीगनुक देवुन मानव जातीचे अन्न म्हणुन प्रण्यचा नाश केला तसेच गोवंश विक्री करीता बांळगंताना मिळुन आला करीता नमुद आरोपी विरुध्द माझि कलम 5,5(क)5(ड) 9(अ) महाराष्ट्र पशु सरक्षन अधिनियम 1976 सह कलम 11(1)(i) प्राण्याचा छळ प्रतीबंधक अधिनीयम 1960, सह कलम 429 भादवी अन्वये गुन्हा नोद |

## जुगार

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४०/२४ कलम १२ अ मजुका | २ | शीतलामाता मंदीर टापर हॉस्टेल राजापेठ अमरावती | घटना ता. वेळी - १५/०१/२०२४ चे १३/०० वा. ते दाखल | दि १५/०१/२०२४चे १९.५३ वा | सरतर्फे पोहेका छोटेलाल यादव ब न. ३२३ पो स्टे राजापेठ अमरावती | रोहीत अमोल मांडले वय २२ रा. टापर हॉस्टेल राजापेठ अमरावती | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टे .हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष जुगार रेड केली असता आरोपी रोहीत अमोल मांडले वय २२ रा. टापर हॉस्टेल राजापेठ अमरावती चे ताब्यातुन नगदि ३५० रु.एक बॉल पेन कि.अ.०५ रु/- व जुगाराच्या चीठ्ठया असा एकुन ३५५रु/- चा मुददेमाल मिळुन आला वरुन आरोपी विरुध्द कलम १२ अ मजुका अन्वये गुन्हा नोंद |
| ३ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४१/२४ कलम १२ अ मजुका | २ | चवरे नगर सरकारी संडासचे मागे अमरावती | घटना ता. वेळी - १५/०१/२०२४ चे १२/०० वा. | दाखल दि १५/०१/२०२४चे २३/२२ | सरतर्फे पोहेका नीलेश गुल्हाने ब न. २६ पो स्टे राजापेठ अमरावती शहर | १.गणेश बाळकृष्ण कोहळे वय २७ रा. जयनगर अमरावती२.अजय राजेश यादव वय २९ रा.जय नगर गल्ली न.१ अमरावती | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टे .हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष जुगार रेड केली असता आरोपीतांची अंगाझडती घेतली असता त्यांचे क्र १ जवळील नगदि ३६० रु.एक बॉल पेन कि.अ.०५ रु/- व जुगाराच्या चीठ्ठया असा एकुन ३६५रु/- चा माल क्र.२ जवळ एक मोठे बुक ज्यामध्ये जुगाराचा पुर्ण हिशोब लिहलेला मिळुन आला .सदर ईसमांना त्यांची नावे व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव १.गणेश बाळकृष्ण कोहळे वय २७ रा. जयनगर अमरावती २.अजय राजेश यादव वय २९ रा.जय नगर गल्ली न.१ अमरावती असे सांगीतले वरुन आरोपी विरुध्द कलम १२ अ मजुका अन्वये गुन्हा नोंद |

## प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र ४०/२०२४ कलम ६५ ई मदाका | संजय गांधी नगर नं २ बौध्द विहार जवळ अमरावती | दि १५/०१/२०२३ चे १९/१५ वा | दा ता वेळ दि १५/०१/२०२३ चे २१/३१ वा | पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | संदिप दिलीप घोडे वय ३७ रा संजय गांधी नगर नं २ बौध्द वीहारा जवळ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद फिर्यादी हे मा व पो नी सा. यांचे आदेशाने पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर येथे तैनातीस असुन डि.बी. पथक प्रमुख म्हणुन काम पाहतात ते पो स्टे हददीत पेट्रोलीग करीत असतानां एका गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक खबर मिळाले वरुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी याचे वर प्रो रेड केली असता पंचांसमक्ष त्याचे ताब्यातुन १० लीटर गावठी हातभटटी दारु किं अं २०००/—रू. चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी याचे हे कृत्य कलम ६५ ई म दा का प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | नांदगावपेठ मर्ग क्र ०५/२४ कलम १७४ जा.फौ. | बसस्टँन्ड नांदगावपेठ | घ ता वेळ-दि १५-०१-२४ चे ११/०० वा दाखल ता वेळ दि १५/०१/२४ चे २०/३३ वा | चरणदास श्रीरामजी चापके वय ६३ वर्षे रा.शिक्षक कॉलणी नांदगावपेठ ता.जि अमरावती | सुरज विजय चापके वय २९ वर्षे रा.शिक्षक कॉलणी कॉलणी नांदगावपेठ ता.जि अमरावती | विहरीत उडी मारुन आत्महत्या | हकीकत अशा प्रकारे आहे की दि १२/०१/२४ रोजी फि चे मोठे बाबा यातील मृतक हे घरुन निघुन गेले होते त्यांचा नातेवाईक व गावात शोध घेतला ते मिळुन आले नाही म्हणून दि १३/०१/२४ रोजी पोस्टे ला मिसिंग दाखल केली दि १५/०१/२४ रोजी सकाळी ११/०० वा फि घरी हजर असतां नांदगावपेठ येथील बसस्टँन्ड च्या मागील मोकळ्या जागेवर असणाऱ्या विहरीत एक इसमाचे प्रेत तरंगत असल्याची फि ला माहीती मिळाली फि ने तिथे जावुन पाहीले असता अग्नीशमन दलाने प्रेत बाहेर काढले फि ने त्यांचा ओळखले एक वर्षे पुर्वी फि च्या मोठे आईचे निघन झाल्याने मृतक हे चिंतेत होते त्यामुळे त्यांचे मोठे बाबा ने आत्महत्या केली असुन फि चा कोणावरही संशय नाही अशी फि यांचे जबाणी रिपोर्ट सदरचा मर्ग दाखल | तपास अधिकारी-पोउपनी गजानन लोकडे पोस्टे नांदगावपेठ |